# मुंबई विद्यापीठ

क्र. क्रीडा./ ६४ / २०२२

परिपत्रक :–

विषय:– भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवनिमित्त आयोजित ७५ कोटी सुर्यनमस्कारांच्या संकल्पामध्ये मुंबई विद्यापीठातील सर्व संलग्नीत महाविद्यालये व संस्थाचे प्राचार्य/संचालक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांकरीता दि. ०१ फेब्रुवारी, २०२२ रोजी ऑनलाईन (आभासी) पद्धतीने औपचारिक उद्घाटनामध्ये सहभाग घेणेबाबत.

संदर्भ:– १) विश्वविद्यालय अनुदान आयोग यांचे परिपत्रक क्र. D.O. No. 2-12/2021 (CPP-II); दि. २९ डिसेंबर, २०२१ अन्वये,
२) क्रीडा विभागीय परिपत्रक क्र.क्रीडा/६३/२०२२; दि. २५ जानेवारी, २०२२ अन्वये,
३) क्रीडा भारती (कोकण विभाग) यांचे पत्र क्र. निरंक; दि. २७ जानेवारी, २०२२ अन्वये,
४) युवा कार्यक्रम और खेल मंत्रालय राष्ट्रीय सेवा योजना निदेशालय, नई दिल्ली यांचे पत्र क्र. अ.शा.पी. २४–१/रासेयो/निदेशा/२०२१/१०–२५; दि. १० जानेवारी, २०२२ व आयुष मंत्रालयाचे पत्र क्र. M-16030/1/2022-YN; दि. १० जानेवारी, २०२२ यांचे पत्र समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना यांनी दि. ११ जानेवारी, २०२२ रोजी ई–मेलद्वारे पाठविलेले पत्र.

महोदय/महोदया,

मुंबई विद्यापीठाशी सर्व संलग्नित/मान्यताप्राप्त महाविद्यालये/संस्थाचे प्राचार्य/संचालक तसेच विविध विभागातील संचालक/विभागप्रमुख व प्रभारी संचालक यांना उपरोक्त संदर्भिय विषयांन्वये कळविण्यात येते की, मुंबई विद्यापीठ व क्रीडा भारती यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवा निमित्त ७५ कोटी सुर्यनमस्कारांचा संकल्प आयोजित करण्याचा औपचारीक उद्घाटन सोहळा मा. कुलगुरु, प्रा. (डॉ.) सुहास पेडणेकर यांच्या शुभहस्ते व मा. प्र–कुलगुरु डॉ. रविंद्र कुलकर्णी यांच्या उपस्थितीत मंगळवार दि. ०१ फेब्रुवारी, २०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता ऑनलाईन (आभासी) पद्धतीने आयोजित करण्याचे योजिले आहे. तसेच या उपक्रमाचे मार्गदर्शक मा. डॉ. सतिश पाठक असतील.

आपणांस विनंती करण्यात येते की याबाबत सर्व संलग्नित महाविद्यालये/संस्थेतील प्राचार्य/संचालक व विभागातील संचालक/विभागप्रमुख व प्रभारी संचालक यांनी कार्यवाही करावी. तसेच खाली नमूद केलेल्या संकेतस्थळाच्या लिंकवर आपला सहभाग नोंदवावा. धन्यवाद!

**Join Zoom Meeting Link -**
https://us02web.zoom.us/j/87048984409?pwd=Z1VXZ2lQZ0ZUNm1haGlkWXdVUS83Zz09
Meeting ID: 870 4898 4409
Passcode: 650816

मुंबई – ४०० ०३२
२९ जानेवारी, २०२२

कुलसचिव,
मुंबई विद्यापीठ

प्रत:–मुंबई विद्यापीठाशी सर्व संलग्नित/मान्यताप्राप्त महाविद्यालये/संस्थाचे प्राचार्य/संचालक तसेच विविध विभागातील

महाराष्ट्र शासन

# विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल

## शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल जि.रायगड-४१० २०६.

ई-मेल पत्ता :- jtdire.१११५@gmail.com दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४५३८२०)

जा.क्र.विसस/उशि/कोविप/२०२२-२३/ 266 दिनांक: ०१/०२/२०२२

प्रति,

**अ) कुलसचिव,**

१.मुंबई विद्यापीठ, मुंबई

२.एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबई

३ अमेटी विद्यापीठ, पनवेल, जि.रायगड.

४.छत्रपती शिवाजी महाराज, विद्यापीठ, पनवेल, जि.रायगड.

५.विजयभूमी विद्यापीठ, कर्जत, जि.रायगड.

**ब) प्राचार्य,**

सर्व अशासकीय अनुदानित, विना अनुदानित व कायम विना अनुदानित,
कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, शारीरिक शिक्षण व आदर्श महाविद्यालये,
जि.रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे, पालघर.

**विषय :- भारताच्या ७५ व्या स्वातंत्र वर्धापन दिनाच्या अनुषंगाने "आझादी का अमृत महोत्सव" या शिर्षाखाली केंद्र शासनाच्या वतीने "National Intellectual Property Awareness Mission (NIPAM)" हा कार्यक्रम महाविद्यालयात राबविणेबाबत.**

**संदर्भ:** - क्र. २०२२ आयपीओएम/एनआयपीएम/एसबीपी/२७१४ दि२५/१/२०२२

उपरोक्त विषयास अनुसरुन केंद्र शासन संचलीत पेटेंटस कार्यालय मुंबई यांचेकडून विदयार्थी व शिक्षक यांच्यामध्ये **"Intellectual Properties"** उदा **Patents, Designs, Trademarks, Copyrights, and Geographical Indications.** या बाबत जनजागृती करण्याकरिता मोहिम आयोजित केली आहे. या करिता वर नमूद केलेल्या कार्यालयाकडून **ऑनलाईन/ऑफलाईन कार्यशाळा तसेच वेबीनार** प्रत्येक महाविदयालयामध्ये आयोजित करण्यात येणार आहेत. या कार्यक्रमामुळे विदयार्थ्यांमध्ये त्यांच्या **नवनिर्माण** कल्पना, नावीन्यपूर्ण किंवा त्यांच्यामध्ये असणा-या वैविध्यपूर्ण संकल्पनांचे संवर्धन करण्याकरिता हा उपक्रम निश्चितच उपयोगी पडणारा आहे. या नाविण्यपूर्ण उपक्रम भारताच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त सादर करण्यात येणा-या **"आझादी का अमृत महोत्सव"** या शिर्षाखाली होणा-या **"Intellectual Property rights"** या बाबतच्या जनजागृती योजना देशातील १० लक्ष विदयार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचा मानस पेटंट कार्यालयाने व्यक्त केला आहे.

करिता या विभागातील सर्व महाविदयालयांनी या उपक्रमामध्ये सहभाग घेवून आपल्या महाविदयालयामध्ये **कार्यशाळा/वेबीनार कोविड-१९ च्या नियमांचे** पालन करुन आयोजित करण्याकरिता सदर पेटंट कार्यालयास सहकार्य करुन उपकृत करावे, या करिता सोबत जोडलेल्या **श्री.सागर बाबूराव पोळ, Assistant Controller of Patents & Designs, Patents office, Mumbai** यांच्याशी पत्रात नमूद केलेल्या भ्रमणध्वनी क्रमांक तसेच ई-मेल वर सर्व महाविदयालयांनी संपर्क साधून आपल्या कार्यशाळेची नियोजीत वेळ व दिनांक ठरविण्यात यावा, व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयात सादर करावा.

(डॉ.संजय जगताप)
**विभागीय सहसंचालक**
**उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल.**

प्रत :- मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.